# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## नवीन वर्षाच्या निमित्य नागपूरकरांना मेट्रो स्टेशनची भेट
## २० डिसेंबर २०२४ पासून इंदोरा चौक मेट्रो स्टेशन नागरिकांच्या सेवेत
## सायंकाळी ६ वाजता पासून स्टेशन नागरिकांच्या सेवेत




नागपूर : नवीन वर्षाच्या निमित्य नागपूरकरांना दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी इंदोरा चौक मेट्रो स्टेशन नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. इंदोरा चौक मेट्रो स्टेशनला रेल्वे सुरक्षा आयुक्त यांनी या मेट्रो स्टेशन येथून प्रवासी सेवा सुरु करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र महा मेट्रोला प्रदान केले

असून दिनांक २० डिसेंबर  २०२४ सायंकाळी ६ वाजता पासून मेट्रो स्टेशन नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत. इंदोरा चौक मेट्रो स्टेशन येथे खापरी मेट्रो स्टेशनच्या दिशेने जाणारी पहिली ट्रेन सायंकाळी ०६.०५ वाजता पोहोचेल व आटोमोटिव्ह चौक मेट्रो स्टेशनच्या दिशेने जाणारी पहिली ट्रेन सायंकाळी ०६. ०२ वाजता पोहोचेल.

दर १० मिनिटांनी मेट्रो सेवा : सकाळी ६.०० वाजता पासून ते रात्री १०.०० वाजता पर्यंत दोन्ही मार्गिकेवरील मेट्रो सेवा (ऑरेंज लाईन : खापरी मेट्रो स्टेशन ते आटोमोटिव्ह चौक मेट्रो स्टेशन) व (ऍक्वा लाईन : लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन ते प्रजापती नगर मेट्रो स्टेशन) दर १० मिनिटांनी उपलब्ध असतील आटोमोटिव्ह चौक मेट्रो स्टेशन येथून इंदोरा चौक मेट्रो स्टेशन हे तिसऱ्या क्रमांकाचे मेट्रो स्टेशन आहे.

आता ३८ मेट्रो स्टेशन स्टेशन वरून सुटणार मेट्रो ट्रेन: सीएमआरएसचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे आता ३८ मेट्रो स्टेशन (ऑरेंज लाईन मार्गिकेवरील १८ मेट्रो स्टेशन व अँक्वा लाईन मार्गिकेवरील २० मेट्रो स्टेशन) येथून मेट्रो सेवा नागरिकांकरिता उपलब्ध असतील. ऑरेंज लाईन मार्गिकेवर एकूण १८ मेट्रो स्टेशन असून याचे अंतर १९.६५८ किमी आहे.

इंदोरा चौक मेट्रो स्टेशन येथे उतरून प्रवासी सहजपणे पांचपावली,जरीपटका,कमाल चौक, आयनॉक्स, मेकोसाबाग परिसरात जाऊ शकतात. तसेच या परिसरात मार्केट,मॉल,शासकीय कार्यालय, तसेच मोठ्या प्रमाणात लोक वस्ती आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात या स्टेशनचा परिसरातील नागरिकांना निश्चितच लाभ होणार आहे.

मेट्रो स्टेशनची वैशिष्ट्ये:  १०,२३३ चौ.स्के मी मध्ये स्टेशनचे निर्माण कार्य केले असून या ठिकाणी चार मजली (G+4) स्टेशनचे निर्माण कार्य करण्यात आले ज्यामध्ये १० एस्केलेटर्स आणि ६ लिफ्टचा समावेश आहे. मेट्रो स्टेशनला पूर्व -पश्चिम दिशेने २ प्रवेश आणि बाहेर जाण्याचे मार्ग आहे. प्रवाश्यानकरिता जिन्याच्या बाजूला फूट-ओवर -ब्रिजचे निर्माण कार्य करण्यात आले आहे. आपातकालीन परिस्थितीचा सामना करण्याकरिता बेसमेंट मध्ये अग्निशामक टँक, दिव्यांग व्यक्तींसाठी लिफ्टची सुविधा,अखंड वीज पुरवठ्यासाठी यूपीएससह डिझेल जनरेटरची (डीजी) व्यवस्था,कॉनकोर्स आणि प्लॅटफॉर्मवर प्रवासी घोषणा प्रणाली, दिव्यांग व्यक्तींसाठी कॉनकोर्स स्तरावर विशेष स्वच्छता गृहांची व्यवस्था, लहान मुलांच्या देखरेखीकरता स्वतंत्र खोली (बेबी केयर रूम), संपूर्ण स्टेशन सीसीटीव्ही कॅमेराच्या निगराणीत असणार आहे.


निर्गमन
निकास • Exit




Indore Square